हे. तैसेच पायगुडे यांचें कुटुंब व आणखी कितीएक लहान थोर सरदार यांचीं कुटुंबें समागमें, आणि शत्रूची प्रबलता भारी, यास्तव मल्हारराव यांणीं लिहिलें तें मान्य करून या स्थळीं छावणी करून रहावें." असें ऐकून सर्वत्र मिळोन, त्यांणीं हास्य करून, विनोदें जावसाल उडवून दिला कीं, " शिंदे होळकर व अंताजी माणकेश्वर व विठ्ठल शिवदेव व गोविंदपंत बुंदेले व नारो शंकर असे सर्वत्र या रा[33]ज्यांत सुख पावले, त्यांस आम्ही आलियाचें सुख नाहीं." ह्मणून हेटाळणी करून कूच केलें. ढोलपूरचे घाटें चमेलीपार झाले.

ढोलपूर नजीक मु[34]चकुंद तीर्थ ह्मणून आहे. जे समयीं देव-साह्यार्थ काल[35]यवन दैत्य यांशीं बहुत काल रात्रंदिवस[मुचकुंदानें]युद्ध करून दैत्य पराभविले. त्यांत कालयवन दैत्य मात्र चुकावून राहिला होता. त्यांसि बहुत रात्री झोंप नव्हती. दिवसा उसंत नाहीं. याप्रकारें मुचकुंद युद्ध करून श्रमला होता. यास्तव ब्रम्हा, विष्णु, महेश्वर हे मुचकुंदाकारणें वर देते जाले कीं, "आमचे कारणीं फार शिणलास यास्तव पाहिजे तो इच्छित पदार्थ मागावा." असें म्हणतांच मुचकुंद देवापाशीं वर मागता जाला कीं, "मी युद्ध करून फार श्रम पावलों आहें. यास्तव बहुत काल इच्छा पुरे तों पावेतों मजला झोंप द्यावी." ऐसें ऐकून ब्रह्मदेवें मस्तकीं हस्त ठेविला कीं, "सं[36]ख्यारहित तुजला निद्रा दिली. तूं निजला असतां तुला कोणी उठवील त्याजवर तुझी दृष्टी पडतांच त्याणें जळोन भस्म व्हावें" ह्मणोन वर देऊन त्यास ढवळपुरा पासून वरतें कोसावर लहानसा पहाड आहे, तेथें गुहा आहे, त्यांत निद्रा करविली होती. असे बहुत दिवस जाले होते. तों कोणे कालें करून विष्णूचे व कालयवन याचें अतिशय करून युद्ध जालें. ते समयीं ब्रह्मराक्षस याचें बळ भारी म्हणोन विष्णूस फार संकट प्राप्त जालें कीं, " कालयवन आपणास आटोपत नाहीं, त्यास यत्न काय करावा?" म्हणोन ध्यानांत आणिलें. मग विष्णु नाटकी मुर्ती, कौशल्य केलें. कालयवनाचे भयें, ज्या गुहेंत मुचकुंदानें निद्रा केली होती तेथें पळत येऊन आपला पीतांबर होता तो मुचकुंदावर पांघरूण घालून आपण गुप्त जाले. तों मागें धांवत कालयवन गुहेस आला. तो निद्रागत पीतांबर पांघरून विष्णु-शोधार्थ लागला. कालयवन दैत्य दुर्वृत्त, त्याणें रागें करून लाथेनें हाणून त्यास जागा केला, आणि बोलिला कीं, " चोरा, पळून येऊन लपून पडला आहेस, तुजला वांचूं कैसा देतों?" म्हणून लत्ताप्रहारें त्यास ताडन

३३. जेथें जेथें 'राज्य' असा अर्थ असावा तेथें तेथें 'राण' असा तुं॰प्रतीचा पाठ आहे. रान=मुलुख, प्रदेश.

३४ मुचकुंद-सूर्यवंशी राजा. याणें देवास साहाय्य केलें.

३५. कालयवन=या ठिकाणीं 'कालेय' असावेसें वाटतें. ही कालयवनाची कथा हरिविजय, अध्याय २२ किंवा बृहद्दशम, अध्याय १ यांत पहावी.

३६. 'शंकारहित' तुं॰ प्रत.

॥ श्री ॥

# श्रीमंत नारायणराव पेशवे यांची बखर

## कारभारी पक्षाच्या हकीगतीसुद्धां.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमंत कैलासवासी नारायणराव साहेब यांची हकीगत कशी काय जहाली, याचा मजकूर. श्रीमंत कैलासवासी थोरले माधवराव साहेब राज्य करीत असतां पुढें कांहीं दिवसांनीं त्यांची प्रकृति बिघडली म्हणून थेऊरचे गणपतीस आराम होण्या करितां गेले. त्यांचे बराबर नारायणराव साहेब सर्व मुत्सद्दी तमाम सारे गेले होते. तेथें गेल्यावर प्रकृति अति अवस्था बिघडली. राजश्री सखाराम बापू व त्रिंबकराव मामा व नाना फडणीस यांस बोलावून सांगितलें कीं, या विकृतींतून पार पडतों असें दिसत नाहीं. त्यास श्रीमंत राजश्री दादासाहेब यांचा बंदोबस्त आम्हीं आज पावेतों ठेविला होता. आतां आमचे पश्चात् कसा राहील ! त्यांत चिरंजीव राजश्री बाळासाहेब यांचा कारभार फारच भोळवट याजकरितां त्यांस लहानपणीं नारायणराव साहेब म्हणत होते [ ? ] तों नेत्रांस पाणी आलें. मग सखाराम बापू याणीं विनंती केली कीं, आपण तिळप्राय चिंता न करावी. हें कर्मट प्रायश्चित [ ? ] एतद्विषयीं मनांत न आणावें. ईश्वर आपल्यास पार पाडील. कदाचित् तशी गोष्ट जहाली तर आम्हीं चार मुत्सद्दी आहोंत. सरकारचे आज्ञे प्रमाणें सर्व बंदोबस्त राखूं. श्रीमंत राजश्री नारायणराव साहेब यांजकडून राज्य असेंच चालवूं.

असें बोलल्यावर दोन चार रोजांनीं रावसाहेब कैलासवासी जाल्याउपर बारा दिवस होऊन नंतर श्रीमंत राजश्री नारायणराव साहेब यांस साताऱ्याहून वस्त्रें आलीं. [ त्या वरून ] श्रीमंत नारायणराव साहेब यांचे मनांत आपणच धणी [ असें आलें. ] सर्व मुत्सद्दी सुद्धां पुण्यास स्वारी आली. कारभार करूं लागले. त्यांजपाशीं लहान पणापासून बाबाजी बर्वे या नामें होता तो मोठया कारभारांत नेमला. तो जें करील तें प्राधान्य. मुत्सद्दी यांचे नारायणराव साहेब यांचे मनांत गो [ ? ] ऐकूं नये. श्रीमंतांची मर्जी बाबाजीवर पूर्ण. चार महिने बरा वाईट कारभार केला. मग सौ॥ आनंदी बाई साहेब यांस वैषम्य शल्य

* हे प्रकरण आम्हांस कै० नारायण अनंत उकिडवे यांणीं बडोद्याहून मूळ प्रतीची नक्कल करून पाठविलें. अस्सल कोठील, कोठें आहे व कोणी, केव्हां लिहिलें त्याजबद्दल माहिती नाहीं.

नहालें कीं, नारायणराव साहेब राज्य करितो हें ठीक नाहीं. सबब नारायणराव साहेब यास ठार मारण्याची मसलत करावी. सबब खरगसिंग व सुमेरसिंग जमादार परदेशी सरकारचे वाड्यांत पांच हजार गारदी चौकी पहाऱ्यांत श्रीमंतांपाशीं होते व खिजमतगार हुजरे तुळाजी पंवार व चापाजी टिळेकर दोनशें हुजऱ्यांत मुख्य होते, त्यां पैकीं पवार व दोन जमादार यांस बोलावून आणून विचारलें कीं, "तुम्हांस मनसोबा सांगतें. बाहेर बातमी फुटूं देऊं नये. तुम्हांस बक्षीस जें मागाल तें देईन. तुमची खबरदारी समजली पाहिजे मग मी सांगेन." त्यांणीं विनंती केली कीं, आम्ही अगोदर काय सांगावें? आपले मनांत काय आहे तें समजलें पाहिजे. त्या सारखी विनंती करूं. मग आणभाष, बेलभंडार घेऊन सांगितलें कीं, नारायणराव साहेब यांस मारावयाचा मनसोबा आहे. मग खरगसिंग व सुमेरसिंग व तुळाजी पवार यांचीं नांवें घातलीं. तिघांनीं विनंती केली कीं, आम्हांस दादासाहेब यांची स्वदस्तुरची याद मारावा अशी आणून द्यावी. म्हणजे आम्ही त्याची तजवीज करूं. मग आनंदी बाईंनीं याद लिहिली. दोघे जमादार व तुळाजी पवार यांचीं नांवें घातलीं. एके दिवशीं याद घेऊन देवघरांत दादासाहेब ध्यानस्थ बसले होते, त्यांची स्नान संध्या तपश्चर्या विसर्जन होतांच याद पुढें ठेविली. ती दादासाहेब यांनीं वाचून पाहून बोलले कीं, तूं काय म्हणतेस! आनंदी बाई यांजला सांगितलें कीं, तो परकी नाहीं. प्रत्यक्ष पुतण्या! तो पुत्राप्रमाणेंच आहे. कांहीं गैर रीतीची वागणूक होईल आणि राज्यास अपाय होत असल्यास बंदोबस्त करावा. परंतु मारावा अशीं अक्षरें कदापि घालणार नाहीं. या खेरीज कोणती गोष्ट असल्यास बोलावी. तुझे मनांत राज्य करावें असें असल्यास धरावें अशीं अक्षरें घालितों. मग आनंदी बाई बोलली कीं, आडवें पोर आल्यास त्यास कापून टाकावें लागतें. अशा गोष्टी रागें भरून बोलली. मग धरावा अशीं अक्षरें बाईचे आग्रहास्तव घातलीं. मग ती याद आनंदी बाई यांणीं घेऊन देवघरा बाहेर वाचली. कलमदान बराबरचं होतें. एक अक्षर फिरवावयाचें [ होतें. ] 'ध' चा 'मा' केला. 'मारावा' अशीं आक्षरें स्पष्ट जहालीं. ती याद जमादार व पंवार यांजपाशीं दिली. आणि सांगितलें कीं, "अक्षरें खुद्द खाशांचे हातचीं आहेत." मग ती याद घेऊन मसलतीस लागले.

पुढें नारायणराव कारभार करूं लागल्यास सहा महिने झाले. अवघा कारभार नऊ महिने जहाला. मग जमादार व पवार यांणीं झाडून वाड्यांत फितूर केला. पांच हजार गारदी लोक चौकी पाहाऱ्याचे तामाम सारे परदेशी होते. तो फितूर होतांच हे वर्तमान चापाजी टिळेकर व दुसरे आणखी हुजरे यांस समजलें

कीं, " वाड्यांत आनंदीबाईसाहेब यांचा फितूर दिसतो. फितुरांत तुळाजी पवार व दोन जमादार आहेत." त्याचा अगोदर बंदोबस्त करावा. म्हणोन नारायणराव यांस विनंती केली. तेव्हां बोलिले कीं, " बंदोबस्त करूं. त्यांनीं काय करावयाचें आहे.?" हें वर्तमान फितुराचें सखारामबापू व त्रिंबकरावमामा व नानाफडणीस व हरीपंत फडके यांनीं [ ऐकून ] नारायणराव यांस विनंती केली कीं, " वाड्यांत फितूरच दिसतो. आमचे स्वामी ऐकत नाहींत. बाबाजी जें करतील तें प्रमाण. परंतु आधीं बंदोबस्त करावा." इतकें सुचविलें असतां दोघांनीं मनावर घेतलें नाहीं. पुढें आठ चार दिवशीं मारणार तो सगळे गारदी दरवाज्या बाहेर येऊन बोलले कीं, आमचे तरफेचा सर्व हिशोब करावा. आम्हांस चाकरी करावयाची नाहीं." अशीं बोलणीं घातलीं. मग चापाजी टिळेकर यांणीं पुन्हा विनंती केली कीं, गारदी लोक सर्व एकेठिकाणीं जमले असा अर्थ नाहीं. परंतु फितूर खास आहे. याची उपेक्षा करूं नये. याचा बंदोबस्त करावा. पुढें ज्या दिवशीं मारणार ते दिवशीं प्रातःकाळीं स्वारी नारायणराव साहेब यांची पर्वतीस गेली होती, तेथें स्नानसंध्या भोजन वगैरे करून स्वारी गणेशखिंडींत कुलाबकर राघोजी आंग्रे सरखेल त्यांस पूर्वापार सामोरें जावयाचा शिरस्ता म्हणोन गेले. तों तेथें आंग्रे यांची भेट जहाल्यानंतर श्रीमंत व आंग्रे हे लकडी पुलापर्यंत आले. तेथें चापाजी टिळेकर यानीं विनंती केली कीं, "आज स्वारी बाहेर आली. तर आपणांस ठार वाड्यांत मारण्याचा बेत केला आहे, सबब स्वारी पर्वतीस जावी, आणि वाड्यांत बंदोबस्त करावा. नंतर वाड्यांत स्वारी जावी. हें नीट असे." इतकें सांगितलें असतां मनावर घेतलें नाहीं. " तिसरे प्रहरीं बंदोबस्त करूं " म्हणोन बोलले. स्वारी आली. आंग्रे आपले वाड्यांत गेले.

दोन प्रहरीं दिवाणखान्यांत जाऊन झोंपाळ्यावर बसले आणि विडा खाऊं लागले. तों जमादार यांणीं गारदी शिपाई वाड्यांत घेऊन दरवाजे लाविले. आणि जिकडे तिकडे " दीन दीन " केली. हें वर्तमान नारायणराव साहेब यांजला लागतांच घाबरे जाहाले. आतां कसें करावें ? चापाजी टिळेकर यांणीं विनंती केली कीं, " या मागें मी आपल्यास आजपर्यंत विनंती करितां दमलों. परंतु स्वामींनीं मानिलें नाहीं. अजून तरि विनंति करितों तों ऐकावी. वाड्यांत भुयार आहे. भुयारांतून माझा हात धरून चलावें. मी आपल्यास बाहेर काढितों. मग श्रीमंत नारायणरावसाहेब बोलले कीं, " भुयारांत शिरावयास आम्हांस धीर होत नाहीं. दादासाहेब यांचा फितूर आहे. त्यांजकडेसच जाऊं. म्हणजे

१. दोघानीं=श्रीमंत व बर्वे.

२. तरफेचा=तलबेचा ? राहिलेला पगार.

ते मारूं देणार नाहींत. कदाचित ते धरतील." मग तेथून नारायणरावसाहेब व चापाजी टिळेकर हे दोघजण दिवाणखान्यांतून उतरून थोरले चौकांत आले. तों त्यांची पूजेची गाय मध्यें आली. तों तिकडून खरगसिंग व सुमेरसिंग व तुळाजी पवार हे तिघजण पाठीमागें तरवारा नागव्या करून धांवत आले. तो पुढें गाय देखिली आणि गाय ठार मारिली. तों इतक्यांत धांवत नारोबा फाटक पुढें आला. त्याजला तोडून टाकतात तों पर्यंत नारायणरावसाहेब जेथें दादासाहेब बसले होते तेथें धांवत जाऊन गळ्यांत मिठी घातली, आणि बोलूं लागले कीं, "आतां मला वांचवावें." इतक्यांत पवार व जमादार जवळ येऊन भिडले. दादासाहेब यांणीं 'थांबा' म्हणोन हात केला. मग ते बोलले कीं, "आतां याला वाचवूं! हा उद्यां आमचीं मुलें माणसें ठार मारील. 'मारावा' अशीं अक्षरें तुमचे हातचीं आहेत. आतां थांबा कसें म्हणतां? पुढें लोटून द्यावा नाहीं पेक्षां दोघांस ठार मारूं." असें बोलून नारायणराव साहेब यांजवर हात टाकिला. तों दादासाहेब याची पागोट्याची कंगणी तुटली. हें पाहून दादासाहेब भयाभीत जहाले. गळ्याजवळचा हात सोडून पुढें लोटून दिला, तों चापाजी टिळेकर यानें नारायणराव साहेब यांचा बंदोबस्त करावा म्हणोन आंगरख्यासुद्धां आंगावर पडला. मग बोलला कीं, "आधीं मला मारावें." असें म्हणतांच तुळाजी पंवार यांणें दोघांचेही तीन तुकडे केले. इतक्यांत राजश्री इच्छाराम ढेरे हुजूरचे पागेदार पुढें आले, त्यास तेथेंच ठार मारलें. गर्दी वाड्यांत जाली.

हें वर्तमान शहरांत कळलें कीं, नारायणराव साहेब यांस गर्दी करून धरिलें. मग सखाराम बापू व त्रिंबकराव मामा व नानाफडणीस व हरिपंत फडके व रघोपंत सीतकार [?] व रायोजी आंग्रे असे एकत्र मिळून दरवाज्यापाशीं आले. तों फौज फार दरवाज्यापाशीं जमली. तों दरवाजे बंद. वाड्यांत जाण्यास रस्ता नाहीं. आंग्रे यांणीं सांगितलें मोठी शिडी लावून दरवाजा पाडावा आणि नारायणराव साहेब यांस सोडवावें. इतक्यांत दरवाजेकरी याणें हाक मारली कीं, "दरवाजे कशास फोडतात, नारायणराव यास ठार मारिलें." हें ऐकतांच सर्व मुत्सद्दी व आंग्रे श्रमित होऊन आतां वाड्यांत जाऊन काय करावें? दादासाहेब यांस कसेंही करून धरावें.

मग झाडून सारे तमाम मुत्सद्दी एक ठिकाणीं बसून विचार केला कीं, आतां

---

३. नारोबा हा शिप्या होता.

४. कंगणी=वरल्या पट्या.

टिळेकर यांस यवतपूर ता. पुरंदर हा गांव इनाम आहे.

६. श्रमित=श्रमी=दुःखित.

दादासाहेब यांस रक्ताचा टिळा लावून गादीवर बसवावें. असें बोलून फडावर जाऊन मुत्सद्दी वगैरे यांची कचेरी केली. आणि चौघडे वगैरे वाद्यें सुरू जहाली. अशी खुषी वाड्यांत मंडळीस जहाली. व सौ आनंदीबाई यांणीं साखरा वाड्यांत वांटिल्या. नंतर चार घटकांनीं दिल्लीदरवाजा उघडला. ते वेळेस कैलासवासी यांची स्त्री सौ. गंगाबाईसाहेब प्रातःकाळीं आपले माहेरीं गेली होती. ती दरवाजा उघडतांच धांवत आली. आणि नारायणराव साहेब पडले होते तेथें येऊन बसली. आणि सती जाण्याचा मनोदय दिसून आला. तों इतकियांत भवानराव प्रतिनिधीही वाड्यांत आले. तो सरकारचे बरोबर प्रतिनिधी सहीत हजार माणसें नागव्या तरवारी करून फडावर आले. आणि दादासाहेब यांस बोलले कीं, "तुम्ही पेशव्यांचे कुळीं जन्म घेऊन हें कर्म अघटित केलें, हें फार वाईट!" असें नाना प्रकारचें बोलून म्हणाले कीं "तुमचें तोंड पहावयाचें नाहीं." इतकें बोलून माघारीं आले. नंतर त्रिंबकराव मामा हे वाड्यांत येऊन दादासाहेब यांस पुसलें कीं, "नारायणराव याचा मुर्दा आहे त्याचा विचार काय आपण धरिला? व आपण जें केलें तें चांगलें केलें!" तेव्हां दादासाहेब यांणीं सांगितलें, "याचें दहन करावें." त्यावेळेस कोणी ब्राम्हण येईनां. दहशतीमुळें भयाभीत जाले. तेव्हां दादासाहेब बोलिले कीं, "कसेंही करून याचें दहन करावें." मग मामा बाहेर येऊन पांच तेलंग बोलावून पांच रुपये हातावर ठेविले. वाड्यांत घेऊन आले. तों गंगाबाईचा निश्चय बरोबर जाण्याचा पाहून आनंदीबाई यांस बहुत संतोष जहाला. नंतर गंगाभागिरथी पार्वतीबाईसाहेब, भाऊसाहेब यांची बायको, यांजला विचार कळतांच गंगाबाईस बोलली कीं, "तुजला वेड लागलें! बहुत करून कुळक्षय गर्दीत जहाला. तुझी पाळी चुकली आहे. ईश्वर करूं लागल्यास राईचा पर्वत करील." अशा गोष्टी नाना प्रकारें करून सांगितल्या. परंतु मानीना. तेव्हां हातीं धरून खोलींत घातली. आणि बाहेरून कडी लावली. आणि जवळ आपण बसली. मामांस सांगितलें कीं, "मुर्दा न्यावा." या प्रमाणें काकूबाईंनीं सांगितलें. कारण पार्वती काकूबाई हा

---

७. रक्ताचा टिळा लावण्याची वहिवाट उदेपुरास आहे. असो. दादांस टिळा गारद्यांनीं लाविला असें दुसऱ्या ग्रंथांत आढळतें.

८. साठे तपकीर गल्लींतील

९. सरकारी काम चालण्याची जागा. सेक्रेटारिअट.

१०. त्यांसे श्रीमंत अशा तऱ्हेनें पडले असतां त्यांस वाहून नेण्यास त्यांचें अन्न खाल्लेल्या ब्राम्हणांतून वेळीं एकही उपयोगी पडू नये या उपर आणखी लज्जेची गोष्ट कोणती? असो. पिटाचा नारायणराव करून त्याजबरोबर एक महत्वाचा कागद प्रथम जाळला, नंतर नारायणरावाचें शव नदीवर नेलें, असें ऐकिवांत आहे त्यास येथें आधार नाहीं.

लहानपणापासून नारायणराव साहेब यांचा लाड बहुत करीत होतीं. याचें कारण कीं, भाऊसाहेब हे गिलच्यांचे लढाईंत गर्द जहाले म्हणोन त्यांची स्त्री पार्वतीबाई पोटीं संतान नाहीं म्हणोन बहुत श्रमी होऊं लागली. याजकरितां नानासाहेब यांणीं सांगितलें, "तुम्हीं कष्टी होऊं नये. नारायणराव साहेब हा तुमचा मुलगा! याचें संरक्षण तुम्हीं करावें. सर्व राज्यकारभार तुमचा आहे." म्हणोन पार्वतीबाईकाकू बहुत विचारवंत होतीं. नंतर त्रिंबकराव मामांनीं झोळी करून नारायणराव साहेब यांचा मुर्दा घालून तेलंग यांच्या खांद्यावर देऊन बाहेर काढिला. पूर्वीं मुत्सद्यांनीं सर्व तयारी करून बसले होते. मग सर्वांनीं मिळोन साहेब मजकूर यांचें दहन केलें. दादासाहेब गादी सोडून दूर बसले. सुतक धरिलें.

मग दुसरे दिवशीं सर्व मुत्सद्दी येऊन दादासाहेब यांस भेटले. दादासाहेब यांणीं बारा दिवस जहाल्यावर मग दादासाहेब कारभार करूं लागले. नंतर दादासाहेब यांणीं वेदशास्त्र संपन्न राजमान्य रामशास्त्री यांस बोलावून विचार केला कीं, "कांहीं संगतीच्या योगें करून मजवर अभिश्राप व जनअपवाद होऊन अपकीर्ति जहाली कीं, निमित्य आलें. आतां याचें प्रायश्चित काय?" त्याजवरून शास्त्रीबोवा यांणीं साफ उत्तर केलें कीं, एतद्विषयीं प्रायश्चित दुसरें नाहीं. देहांत [ प्रायश्चित्त ] आहे." याप्रमाणें बोलोन कुटुंबसुद्धां पुण्याहून निघोन वाईक्षेत्रापासोन तीन चार कोसांवर भुगावीं कृष्णा तीरीं स्नानसंध्यादिक षट्कर्मे करून राहिले.

नंतर दादासाहेब यांणीं दोन महिने कारभार केला. गंगाबाईसाहेब गरोदर खरी. त्याजवरून आनंदीबाईसाहेब यांणीं सातखणींत गंगाबाई व पार्वतीबाई यांचा बंदोबस्त करून ठेविल्या. एक दिवशीं नानाफडणीस सातखणी वरून गणेश दरवाज्याकडेस जात होते. तों गंगाबाई व पार्वतीबाई काकू सातखणीच्या खिडकींत उभयतां बसल्या होत्या. त्यांणीं फडणीस यांस खुणावून जवळ बोलाविलें. आणि पार्वतीबाईनें सांगितलें कीं, "गंगाबाईस दोन महिने होऊन तिसरा महिना लागला आहे. हिच्या पोटीं अवतार होईल. आतां तुम्हीं चार मुत्सद्दी आहां. याचा विचार करावा." नानांनीं विनंती केली कीं, "कोणता विचार करावा?" मग पार्वतीबाई काकू बोलिल्या कीं, "दादासाहेब यांस धरावयाचा मनसोबा करावा." हें ऐकून नानांनीं विनंती केली कीं, "आम्ही या मनसोब्यांत आहोंत व आपलीही आज्ञा होत आहे. त्यापेक्षां याचा विचार होईल." अशी विनंती करून लौकर बाहेर निघोन गेले.

वेळेस पहारेकरी कोणी जवळ नव्हते. नाना वाड्यांत जाऊन तेच

शंखध्वनी केली. मग तख्यावरून खालीं उतरले. आणि दुखणें लागलें. त- सेच शिकस्त स्वारी बराबर होते.

तों इकडे सवाई माधवराव यांस बारा दिवस जहाले. पाळण्यांत घातले. नांव सवाई माधवराव ठेविलें. आणि गादीवर बसविलें. तों साताऱ्याहून पत्रें व वस्त्रें आलीं तीं पुढें ठेविलीं. पार्वतीबाई काकू यांनीं सवाईंचे शिक्के, कटारी, सनदा वगैरे ठोकिल्या. सनदा व खबरा महालीं महालीं सरदार व नबाब मोंगल व टिपू सुलतान [ सुद्धां ] सर्वांस पाठविल्या. इकडे दादासाहेब यांस खबरा पाठविल्या. मनांत खुषी जहाली.

दुसरे दिवशीं बापू व हरीपंततात्या फौजे सुद्धां तयार जहाले. तिकडे नबा- ब यांस सूचना केली कीं, तुम्हीं तिकडोन यावें आम्हीं इकडोन येतों. आणि मध्येंच दादासाहेब यांस धरावें. अशी बातमी दादासाहेब यांस समजली. आणि बातमीदार यानेंही सांगितली. त्याजवरून दादासाहेब ज्या मुक्कामीं होते तेथून पळोन गेले. आणि बापू व हरीपंत तात्या पाठीस लागले. ते पळून ना- शिकास गेले. निजामअल्ली व मोंगल पुढें नाशिकावर सामोरे गेले. दादा- साहेब घोडपच्या किल्यावर गेले. पुढें बापू व हरीपंत येऊन पोंचले. आणि किल्यांत फितूर करून दादा साहेब यांस [१२]धरिलें. मग नबाब यांच्या व सखा- राम बापू व हरीपंत तात्या यांच्या भेटी जहाल्या. नबाब यांचा इतमाम रहत राखला. व त्याच्या जवळ खर्चास राहिले नाहीं कारणानें मनाम आगून जागीर पासष्ट लक्षांची व [१३]दौलताबादचा किल्ला दिल्हा. आणि मेजवानी केली. नंतर नबाब यांस निरोप दिल्हा. मग दादासाहेब यांस घेऊन पुण्यास आले. आणि वाड्यांत बंदोबस्त करून ठेविलें. नंतर बापू व हरीपंत तात्या पुरंधरास गेले आणि कारभार झाडून पुरंधरासच चालू लागला.

पुढें सहा महिन्यांनीं दादासाहेब फितूर करून निघाले. फौज घेऊन हरीपं- त तात्या पाठीस लागले. दादासाहेब हे पळत पळत ब्रऱ्हाणपुरास गेले. तों तेथेंही पाठीस लागले. दादासाहेब हे उज्जनीस गेले. तेथें पवार यांचे गांव धारा म्हणोन शहर आहे. तेथें आनंदीबाई प्रसूत जहाली. बाजीराव साहेब यांचा जन्म जहाला. मग बारा दिवस जहाल्यानंतर तेथून कूच करून सुरतेस आले. तेथें पंधरा दिवस मुक्काम केला. तों इतक्यांत हरीपंत तात्यांनीं फौजेंत फितूर केला कीं, दादासाहेब यांस धरावें. तों दादासाहेब व आनंदीबाई साहेब व अमृतराव व बाजीराव साहेब सुद्धां निघून गलबतांत बसून मुंबईस गेले. तों

१२. घोडपच्या किल्यांत माधवरावा- च्या वेळीं दादांस धरिलें होते.

१३. भाऊसाहेबांनीं उदगीरची लढाई मारून घेतलेला मुलुख.

तेथें इष्टुर फांकडा म्हणोन गोरा जहाला होता, तो भेटला. आणि धीर दिला. नंतर दादासाहेब यांनीं आपली हकीगत सांगून चौथाई राज्यांत देण्याची लिहून दिली. इष्टुर साहेब यांस दादासाहेब बोलले कीं, "तुम्ही आम्हांस राज्यावर नेऊन बसवावें" याप्रमाणें सांगून दोन वर्षें दादासाहेब यांस आपले जवळ मुंबईंत ठेविलें. तेव्हां हरीपंत तात्या हे सुरतेहून निघोन पुरंदरास आले.

मग इंग्रज याणें पलटणें गोऱ्यांची पंचवीस हजार जमा करून बरोबर तोफा शंभर व दहा हजार घनतुरूप या प्रमाणें फौज जमा करून दादासाहेब यांस बरोबर घेऊन दाभाडयाचे तळेगांवीं आले. तेथें मुक्काम केला. पेशवे यांणीं पुण्यावर फौजेचा जमाव करून शहर ओस केलें. नारो आपाजीनीं दरोबस्त कडवा भरला. त्याचें कारण कीं, शहर गनीमाचे हातीं द्यावयाचें नाहीं. मग एके दिवशीं सवाई माधव साहेब पुरंदराचे किल्यावर प्रातःकाळीं प्रहर दिवसास तिरंबाजी खेळत होते. त्या समयीं वर्ष पांचवें होतें. तेव्हां दादासाहेब यांची मसलत सिद्धीस गेल्यास आपल्यास पृथ्वींत जागा नाहीं सारखी होईल म्हणोन [ कारभारी ] विचारांत निमग्न होते. तेव्हां सखाराम बापू यांणीं उत्तर केलें कीं, आपले यजमान तिरंबाजी करीत आहेत त्यांजला विनंती करूं. त्यांचें मुखांतून काय अक्षरें निघतात त्या प्रमाणें पुढें करावें. सर्वांचे मर्जीस उतरून रुजू दिल्हा. तेव्हां सखाराम बापूंनीं विनंती केली कीं, "दाभाडयांचे तळेगांवावर दादासाहेब हे इंग्रज यांजला घेऊन उतरले आहेत. आणि आपल्या फौजा अद्याप पुण्यावर आहेत. इंग्रज तर भारी दिसतो. आमची मति चालत नाहीं. आपण अवतारी आहांत. मुखानें जें निघेल तें खरें." श्रीमंत सवाई माधवराव साहेब यांणीं सांगितलें कीं, माझा दुसरा तीरकमठा आणून द्यावा. त्या प्रमाणे आणून देतांच डोळे वटारून कमानीस तीर लाविला. आणि बोलले कीं, उदईक इंग्रजांचा मोड होतो. तुम्हीं तयार होऊन हल्ला करावी." तें बापूंनीं ऐकून हरीपंत तात्यास व पाटील बावांस चिठ्ठी लिहिली कीं, "महाराज धणी यांचा हुकूम जहाला कीं, तुम्हीं उदईक तळेगांवावर हल्ला करावा. इंग्रजांचा मोड होईल." ती चिठ्ठी हरीपंत तात्या व पाटील बावा यांणीं वाचून पाहून फौज तयार करून तळेगांवावर दुसरे दिवशीं येऊन ज्या ठिकाणीं इंग्रज उतरला होता त्याजवर मोठे युक्तीनें जाऊन दोन फेरा केल्या व त्यांजकडील दोन फेरा होतांच इंग्रजांचे स्वार दहा हजार गर्द जहाले. हें पाहून एकदांच उडया घातल्या. आणि पलटणींत घोडे घालून

१४. मुंबईचा गव्हरनर हार्नबी साहेब होता-इष्टुर=स्टुअर्ट. हा एक त्याचा सरदार होता.

तरवार चालविली. आणि तोफा बंद केल्या. व तोफांच्या सांखळ्या तोडून वीर आंत मिसळले. तरवार चालविली. नंतर हातघाई झाली. ते समयीं इष्टुर फांकडा हा एका झाडावर चढून दुरभिण लावून सरकारचा सरंजम पहात होता. तों ते समयीं पानशे यांजकडील गोलंदाज उभा होता. त्यची नजर त्या झाडावर गेली. हें पाहून मनांत म्हणतो कीं, "हा कोणी तो खांसा आहे." म्हणोन त्याजवर शिस्त धरून लावून तोफेस बत्ती दिली. त्या गोळ्यानें ईष्टुर फांकडा इंग्रज ठार जहाला. खांसा पडतांच इंग्रजांचा मोड जाला. नंतर दादासाहेब पळों लागले. पाटीलबावा व हरीपंततात्या त्या सर्व फौसुद्धां पाठीस लागले. पळतांपळतां खंडाळें म्हणोन गांव आहे तेथें दादासाब यांस धरिलें. इंग्रजांचे पलटणीची खात्री जहाली. व कांहीं पलटण राहिली ती पनवेलीस राहिली. मग पाटीलबोवा फौजेसुद्धां कोंकणपट्टी लुटून मागे परत पुण्यास आले. हरीपंततात्या यांणीं दादासाहेब यांस धरून नाशिकाजवळ आनंदवल्ली म्हणोन गांव तेथें नेऊन उभे केलें आणि गंगेचें उदक हातर ठेविलें. आणि पुसलें कीं, "नारायणरावसाहेब यांस मारावा हीं अक्षरें को घातलीं तें खरें बोलावें." मग दादासाहेब बोलले कीं, 'मारावें' हीं अक्ष बोललों नाहीं व आमचे हातचीं हीं आक्षरें नाहींत. 'धरावें' ह्मणोन लिहिलें 'ध' चा 'मा' [ कोणीं ] केला. ही बातमी मजला ठाऊक नाहीं" अइआक्षरें बोलले, तें सर्व समजले. मग दादासाहेब यांचा बंदोबस्त करून आवल्लीचे वाड्यांत ठेविलें. आणि दानधर्माचा बंदोबस्त यथास्थित ठेविला. सर्व रखानें सुरू जहाले. दोन हजार स्वार व पायदळ पांच हजार व हत्ती दहसरा असा सरंजाम कारभारी गोविंदपंत गोडबोले यांस ठेविलें. आणि तात निघोन पुण्यास आले.

श्रीमंत सवाईमाधवराव साहेब यांस पर्वतीस आणोन राज्य करूं लागले. मोठ्या समारंभानें पुण्यास आणिलें. पुढें वर्ष सहामाहिनें बापू व नाना फडणीस एकवारें कारभार करीत होते. तों बापूंचे मनांत आले कीं नानांस व हरीपंस धरावें. असें मनांत आणून मोरोबा दादा फडणीस यांस सांगून ला. मोरोबादादानीं फडणीशी करावी. आपण कारभार करावा. या केला. ती चिठ्ठी नानांस सांपडली. त्यावेळेस महादजी शिंदे ाकरितां गेले तों नाशिकावर मुक्काम केला. मग नानांनीं पाटीविली कीं, "आपले भेटीचें प्रयोजन आहे, तर लवकर व पाटीलबोवा माघारे परतले. पाटीलबोवा यांचा होता, म्हणोन पाटीलबोवा पुण्यास आले. त्यांजला भेटा-

त्यास सर्व मुत्सद्दी गेले. तों पहिल्यानें नाना भेटले. व बापूंची चिठ्ठी सांपडली होती ती पाटीलबोवा यांचे स्वाधीन केली. ती चिठ्ठी वाचून पाहोन आपले पागोट्यांत ठेविली. मग हरीपंत तात्यांस व सर्व मुत्सद्दींस भेटले. व बापूंसही भेटले अंबारीशीं अंबारी भेटविली. आणि भेटी जहाल्या. मग पाटीलबावा यांनीं चिठ्ठी पागोट्यांतून काढोन बापूंस दिली. मग बापू बोलले कीं, " हीं अक्षरें माझीं आहेत नानांस व हरीपंत तात्यांस धरावें" मग पाटीलबोवा बोलले कीं, " याचें पारिपत्य काय करावें ? " " आतां हें पुसणें काय ? " असें बापू बोलले. व पूर्वीं बाराभाईंची यांद जहाली त्याजवर सर्वांचे व माझा रुकार आहे. त्याप्रमाणें व्यवस्था व्हावी असें उत्तर बापूंनीं केलें. मग पाटीलबावांनीं बापूंचे पायांत रुप्याची बेडी घातली आणि सिंहगडावर चढविलें. मोरोबा दादा यांस नगरावर रवाना केले. याप्रमाणें बंदोबस्त केला व नाना फडणीस हे कारभार मुख्यत्वें करीत होते. त्यांस सोळा वर्षे एक छत्री राज्य सवाई माधव साहेब यांनीं व राज्याचा कारभार ही एकछत्री नानांनीं केला. फडणीस जें करतील तें मान्य. पुढें श्रीमंतांचे प्रसन्न करून पाटीलबोवांची मर्जी खुषी करून किताब दिला. व नवगत वस्त्रें देऊन शिक्के कटार व मोहोर श्रीमंतांनीं दिल्हीं. याप्रमाणें श्रीमंतांचे प्रतापें करून यश मिळत गेलें. पाटीलबावा हे मृत्यु पावल्यावर दौलतराव याचे कारकीर्दीत मो... ...रुस्त करून मस्करी म्हणाल तरी श्रीमंतांचीं सोंगें वगैरे आणून वकील दाखवून चलबिचल करीत होते त्यांचे ही पारपत्य होऊन पुण्यांत कैदेंत ठेविले. मग श्रीमंत सवाई माधवराव साहेब हे उडी टाकून कैलासवासी जहाले. मशरूल मुलुख यास सोडून दिल्हे. अशी कथा जहाली.

समाप्त.

---

१५. ' बाराभाई ' हा शब्द त्या काळा- | पासूनच प्रचारांत आला ...